महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र ११८ | दिनांक- ०३/०५/२०२१

**वालीव पोलीसांकडुन महाराष्ट्र राज्य प्रतिबंधीत असलेला ७९,६९,०००/- रुपये किंमतीचा गुटखा वाहतुक करणारे कंटेनर दोन आरोपीतांसह जप्त**

वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नंबर I ४१४/२०२१ भारतीय दंड संहिता कलम ३२८,२७३,१८८,३४ सह अन्न सुरक्षा मानदे अधिनियम कलम २६(२),४,३०(२)(ए) अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचे तपासात आरोपीत नामे.शकिल मोहम्मद समीम खान रा. उत्तर प्रदेश याचेकडेस गुन्हयाचे अनुषंगाने सखोल चौकशी केली असता माहिती समोर आली की, महाराष्ट्र राज्य प्रतिबंधीत गुटखा नामक पदार्थाने भरलेले दोन कंटेनर डहाणु तालुक्यातून जाणा-या राष्ट्रीय हायवेलगत असलेल्या हॉटेल शेर-ए-पंजाबच्या परीसरात लपवुन ठेवलेल्या आहेत. सदर माहिती वरिष्ठांना अवगत केली.त्याअनुषंगाने पुढील कारवाई करण्याच्या सूचना प्राप्त केल्या.

वालीव पोलीस ठाणेचे सपोनि/ ज्ञानेश फडतरे व अंमलदार यांनी दि.२९.४.२०२१ रोजी कासा येथे मुंबई-अहमदाबाद हायवे वरील शेर-ए-पंजाब हॉटेल परिसराल तपास केला असता तपकिरी रंगाचे एक नागलँड पासिंग व एक हरियाणा पासिंग कंटेनर उभे केल्याचे मिळुन आले. सदर कंटेनरचे चालक १) नामे.मदनलाल प्रेमचंद प्रजापती रा.सारोठ, राजस्थान, चालक २) नामे. नरेशकुमार बलवीर सिंग रा.बिपीओछत,हिमाचल प्रदेश यांना त्यांचे ताब्यातील कंटेनर क्रमांक १) एच.आर.६९ सी ५६५२ २)एन.एल.०१ ए.ए.८२५३ यांचेसह ताब्यात घेतले.

**जप्त केलेल्या दोन्ही कंटेनरची बारकाईने पाहणी केली असता त्यामध्ये महाराष्ट्र राज्य प्रतिबंधीत असलेला ३९ लाख ६९ हजार रुपये किंमतीचा तंबाखुजन्य सुगंधित पान मसाला व ४० लाख रुपये किंमतीचे २ कंटेनरसह ७९ लाख ६९ हजार किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला आहे.**

**आज पावेतो दाखल गुन्हा रजि नंबर I ४१४/२०२१ भारतीय दंड संहिता कलम ३२८, २७३,१८८,३४ सह अन्न सुरक्षा मानदे अधिनियम कलम २६(२),४,३०(२)(ए) अन्वये मध्ये एकुण १ कोटी ३६ लाख २५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

वरील कामगिरी श्री.संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री.अमोल मांडवे ,सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री.विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक श्री.दादासाहेब कारांडे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ ज्ञानेश फडतरे, पो.हवा./मुकेश पवार, मनोज मोरे, योगेश देशमुख, पो.ना/ किरण म्हात्रे, सचिन दोरकर, अनिल सोनवणे, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, पो.अंम./ विनेश कोकणी, बालाजी गायकवाड, सचिन बळीद, गजानन गरीबे,सर्व नेमणूक वालीव पोलीस स्टेशन यांनी केलेली आहे.

Scanned with CamScanner